सायं.दैनिक
बीड **किसान**
www.beedkisan.in
• संपादक : शेख कामरान • BEED KISAN

बीड ▪ वर्ष ६ ▪ अंक ९ ▪ शुक्रवार, दि. १५ मे, २०२६ ▪ पोस्टल दिनांक १६ मे, २०२६ ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ पाने ४ ▪ किंमत २ रु.
BEED ▪ Year-6 ▪ Issue-9 ▪ Friday 15 May, 2026 ▪ Postal Date 16 May, 2026 ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ Pages 4 ▪ Price 2

## दुचाकी रॅली, वाहनांची मिरवणूक व अनावश्यक इंधन वापरावर निर्बंध

बीड (किसान न्युज): पश्चिम आशियामध्ये निर्माण झालेल्या तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर केंद्र व राज्य शासनाने इंधन बचत आणि ऊर्जा संवर्धनासाठी विविध उपाययोजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार आता दुचाकी रॅली, वाहनांची मिरवणूक, अनावश्यक वाहन ताफे आणि इंधनाचा अपव्यय होणाऱ्या कार्यक्रमांवर निर्बंध घालण्यात येणार आहेत. शासनाने याबाबत परिपत्रक जारी करून सर्व विभागांना काटेकोर अंमलबजावणीचे निर्देश दिले आहेत. शासनाच्या सूचनेनुसार कोणत्याही शासकीय कार्यक्रमासाठी दुचाकी फेऱ्या, वाहनांची मिरवणूक अथवा मोठे वाहन ताफे यांना परवानगी दिली जाणार नाही. पोलीस विभागालाही अशा कार्यक्रमांना परवानगी देताना विशेष दक्षता घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यामुळे पेट्रोल व डिझेलचा अनावश्यक वापर कमी होण्यास मदत होणार असल्याचे सांगितले जात आहे. तसेच शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शक्यतो सार्वजनिक वाहतुकीचा वापर करावा, एका दौऱ्यासाठी अनेक अधिकारी एकाच वाहनाने प्रवास करावा, तसेच कार्यालयीन बैठका » पान २ वर


# आजपर्यंत कोणत्याही मराठा आमदाराने मराठा भवनासाठी २८ गुंठे जागा दिली नाही; ते काम धनंजय मुंडेंनी करून दाखवले!

## नगर परिषदेकडून परळीत मराठा भवनसाठी २८ गुंठे जागा धनंजय मुंडेंच्या हस्ते जागा हस्तांतरित!

बीड । किसान न्युज

**परळी वैजनाथ शहरात मराठा भवन उभे राहावे अशी गेल्या अनेक वर्षांपासून ची सकल मराठा समाजाची मागणी होती. ना.पंकजाताई मुंडे व माजी मंत्री आ.धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली परळी वैजनाथ नगरपरिषदे कडून मराठा भवनसाठी २८ गुंठे जागा देण्यात आली आहे. स्वराज्यरक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंतीचे औचित्य साधत आज माजी मंत्री आ .धनंजय मुंडे यांच्या हस्ते नामफलकाचे अनावरण करत ही जागा मराठा भवनसाठी हस्तांतरित करण्यात आली आहे.**

वैद्यनाथ मंदिर परिसरात नंदागौळ रस्त्यावर वेताळ मंदिराच्या बाजूला असलेली २८ गुंठे जागा नगरपरिषदेकडून मराठा भवनसाठी नियोजित करण्यात आली आहे. गेल्या अनेक वर्षापासून परळी मध्ये मराठा भवन असावे अशी मराठा समाजाची आग्रही मागणी होती. आता मराठा भवनसाठी ही जागा हस्तांतरित करण्यात आली आहे.लवकरात लवकर सुसज्ज मराठा भवन उभे राहील अशी भूमिका मराठा समाज बांधवांनी व्यक्त केली. या अनुषंगाने आज संबंधित ही २८ गुंठे जागा माजी मंत्री आ .धनंजय मुंडे यांच्या हस्ते हस्तांतरित करण्यात आली.






यावेळी स्वराज्य रक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त प्रतिमेचे पूजन व नियोजित मराठा भवनच्या नाम फलकाचे अनावरण आ.धनंजय मुंडे, नगराध्यक्ष सौ पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी, न. प. गटनेते वैजनाथ सोळंके, नगरसेवक व्यंकटेश शिंदे, श्रीकृष्ण कराड, नितीन बागवाले, अनंत इंगळे, प्रा.शंकर कापसे, देवराव लुगडे, नितीन शिंदे, सेवकराम जाधव, उत्तम माने, उत्तम मोरे, इंजि. संजय देशमुख, राजेश ठोंबरे शिवाजी देशमुख, बाबा शिंदे, महादेव गंगणे, दिलीप माने, वैजनाथ सुरवसे, सचिन मराठे,प्रल्हाद सुरवसे, शरद चव्हाण, गिरीश भोसले, डॉक्टर प्रा.पी.एल.कराड, राजेंद्र सोनी, रमेश चौंडे, विजयकुमार खोसे ,न. प. उपमुख्य अधिकारी संतोष रोडे, नगर अभियंता ढवळे आदींसह सकल मराठा समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी परळीत देखणे मराठा भवन उभे राहील असा विश्वास मराठा समाज बांधवांनी व्यक्त केला. मराठा भवनसाठी ही जागा » पान २ वर

### मराठा भवन मध्ये काय आहे प्रस्तावित?

**दरम्यान,सकल मराठा समाजाच्या वतीने परळी येथे उभारण्यात येणाऱ्या मराठा भवन मध्ये समाज उपयोगी उपक्रम राबवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. मुला मुलींचे वसतीगृह, शिकवणी क्लासेस, अभ्यासिका, नोकरी मार्गदर्शन केंद्र आदी विद्यार्थी कलागुण विकसित करण्यासाठीचे उपक्रम या भवन मधून राबवण्यात येणार आहेत. उद्योग, व्यवसाय मार्गदर्शन, व्यवसायातील बारकावे, येणारी आव्हाने, उद्योजक, व्यावसायिकांचे परिचय मेळावे आदी आयोजित करण्याचा संकल्प करण्यात आलेला आहे. त्याचबरोबर वधू–वर परिचय मेळावे, सामूहिक विवाह कार्य, शिक्षण, आरोग्य, कौटुंबिक, सामाजिक ,व्यावसायिक यासह अनेक विषयावर प्रबोधन मार्गदर्शन मिळावे आयोजित करण्यासाठी मराठा भवन उपयुक्त ठरणार आहे. सर्व गुणसंपन्न पिढी घडविण्याच्या दृष्टिकोनातून ही वास्तू एक महत्त्वाचे केंद्र ठरणार असल्याचा संकल्प मराठा भवनच्या उभारणीत करण्यात आलेला आहे.**

# पेट्रोल,डिझेलचे दर वाढले!

बीड । किसान न्युज

**पश्चिम आशिया खंडात निर्माण झालेल्या तणावपूर्ण परिस्थितीचा परिणाम आता भारतातील इंधन बाजारावर दिसून येऊ लागला आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर कच्च्या तेलाच्या पुरवठ्यावर परिणाम झाल्याने पेट्रोल, डिझेल आणि घरगुती गॅसच्या किमतीत वाढ होत असून, या दरवाढीचा थेट फटका सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे. वाढत्या महागाईमुळे नागरिकांचे मासिक बजेट कोलमडण्याची वेळ आली आहे.**




पश्चिम आशियातील अनेक देश हे जगातील प्रमुख तेल उत्पादक देश मानले जातात. सध्या त्या भागातील संघर्ष, युद्धजन्य परिस्थिती आणि वाहतूक मार्गांवरील अस्थिरतेमुळे कच्च्या तेलाचा पुरवठा विस्कळीत होण्याची भीती निर्माण झाली आहे. परिणामी आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे दर वाढले असून भारतासारख्या आयातीवर अवलंबून असलेल्या देशांवर त्याचा थेट परिणाम होत आहे. देशातील अनेक शहरांमध्ये पेट्रोल व डिझेलच्या दरात वाढ झाल्याने वाहतूक खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. मालवाहतूक महाग झाल्यामुळे किराणा, भाजीपाला, » पान २ वर




# भूसंपादन घोटाळ्यातल्या हंगेचे भरपूर कांड आहेत चौकशी करून सगळं बाहेर काढा

## भूसंपादन घोटाळ्याच्या मुळापर्यंत जाण्याची मागणी



बीड । किसान न्युज

सोलापूर–धुळे राष्ट्रीय महामार्ग भूसंपादन प्रकरणातील कोट्यवधी रुपयांच्या घोटाळ्यानंतर आता या प्रकरणातील कथित सूत्रधार संजय हंगे याच्यावर कारवाईची मागणी अधिक तीव्र होत आहे. केवळ एका प्रकरणापुरती चौकशी न करता, त्याच्या आतापर्यंतच्या सर्व व्यवहारांची, मालमत्तेची आणि आर्थिक उलाढालीची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे. भूसंपादन प्रकरणात बनावट आदेश, वाढीव मोबदला आणि कोट्यवधी रुपयांचे संशयास्पद व्यवहार समोर आल्यानंतर अनेकांच्या नजरा आता संजय हंगेकडे वळल्या आहेत. महसूल विभागाशी संबंधित काही मंडळींना हाताशी धरून त्याने मोठे जाळे उभे केले होते का? याची चौकशी होणे गरजेचे असल्याचे बोलले जात आहे. विशेष म्हणजे, एका घोटाळ्यात इतक्या मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार समोर येत असतील, तर यापूर्वीही अशाच पद्धतीने इतर प्रकरणांमध्ये गैरप्रकार झाले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे संजय हंगेच्या नावावर अथवा त्याच्या निकटवर्तीयांच्या नावावर असलेल्या मालमत्ता, बँक व्यवहार, आर्थिक गुंतवणूक आणि संपत्तीची चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे. स्थानिक नागरिकांमध्येही संतापाची भावना असून सामान्य शेतकऱ्यांच्या हक्काच्या पैशांवर डल्ला मारणाऱ्यांना वाचवले जाऊ नये अशी प्रतिक्रिया उमटत आहे. अनेकांनी तर आर्थिक गुन्हे शाखा, ईडी किंवा अन्य सक्षम यंत्रणांकडून या प्रकरणाची चौकशी व्हावी, अशी मागणी केली आहे. संजय हंगेने स्वतःला विविध संघटनांचा पदाधिकारी » पान २ वर



### पन्नगेश्वर साखर कारखान्याचे अध्यक्ष

## अक्षय मुंदडांच्या वाढदिवसानिमित्त अंबाजोगाईत विक्रमी रक्तदान

अंबाजोगाई । किसान न्युज

केज विधानसभा मतदारसंघाचे युवा नेते तथा पन्नगेश्वर साखर कारखान्याचे चेअरमन अक्षय मुंदडा यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून अंबाजोगाई येथे आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात विक्रमी १३५ रक्तदात्यांनी सहभाग नोंदवला. वसुंधरा सेवा प्रतिष्ठान आणि भारतीय जनता पार्टी अंबाजोगाई तालुका यांच्या वतीने या विधायक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सामाजिक बांधिलकी जपत राबवण्यात आलेल्या या शिबिराला स्थानिक युवकांसह नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला



असून, वाढदिवसाच्या निमित्ताने समाजासाठी उपयुक्त ठरेल असे कार्य केल्याबद्दल सर्व स्तरातून कौतुक होत आहे. » पान २ वर

## नीट परीक्षा २०२६ साठीची नवीन अपडेट: २१ जूनला होणार परीक्षा

दिल्ली । वृत्तसेवा

नीट परीक्षा २०२६ साठीची नवीन अपडेट राष्ट्रीय टेस्टिंग एजन्सीने जाहीर केली आहे.या अपडेट नुसार आता नीट परीक्षा २१ जून रविवार रोजी घेण्यात येणार आहे. या संदर्भातील माहिती नॅशनल टेस्टिंग एजन्सीने आपल्या अधिकृत एक्स हॅण्डल वर दिली आहे. नीट परीक्षा २०२६ तीन मे रोजी घेण्यात आली होती. या परीक्षेपूर्वीच अनेक विद्यार्थ्यांच्या हाती या परीक्षेची प्रश्नपत्रिका मिळाल्यानंतर ही प्रश्नपत्रिका फुटली असल्याचे तपासाअंती निष्पन्न झाले. त्यानुसार राष्ट्रीय टेस्टिंग एजन्सीने ही परीक्षा रद्द केले असल्याची घोषणा केली. देशातील २३ लाख हून अधिक विद्यार्थ्यांनी नीट २०२६ ची परीक्षा दिली होती. आता अचानक ही परीक्षा रद्द झाल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना त्याचा मनस्ताप झाला. या परीक्षे संदर्भातील तपास नॅशनल टेस्टिंग एजन्सीने सीबीआय कडे दिला. सीबीआयच्या तपासामध्ये राजस्थान मधील सिकर जिल्ह्यात त्याचबरोबर महाराष्ट्रातील नाशिक, अहिल्यानगर, लातूर अणि पुणे या ठिकाणाहून या परीक्षेची संबंधित संशयितांना सीबीआयने अटक केली. त्यानंतर आज नॅशनल टीसी टेस्टिंग एजन्सीने २१ जून रोजी परीक्षा घेत असल्याचे जाहीर केले त्यामुळे आता विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी आणखी काही दिवस वेळ मिळाला आहे.



स्थानिक सोने चांदीचे भाव..
पंकज ज्वेलर्स
पिंगळे गल्ली, कारंजा रोड, बीड
✆ 9850643058
सोने २४ कॅरेट 155,800
२२ कॅरेट 148,000
चांदी प्रतिकिलो 275,000

# चेक बाऊन्स; शिक्षकास सहा महिन्यांची शिक्षा!

## ॲड.शशिकांत सावंत यांची दमदार बाजू ठरली निर्णायक

### कायद्याचे ज्ञान असूनही केला गुन्हा; न्यायालयाने सुनावली कठोर शिक्षा

बीड । किसान न्युज

अनादरीत धनादेश (चेक बाऊन्स) प्रकरणात बीड येथील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी (द्वितीय) न्यायालयाने महत्त्वपूर्ण निकाल देत आरोपी शिक्षकास सहा महिन्यांच्या कारावासाची तसेच दंडाची शिक्षा सुनावली आहे. या प्रकरणात फिर्यादीच्यावतीने ॲड. शशिकांत सावंत यांनी अत्यंत भक्कम व प्रभावी युक्तिवाद करत न्यायालयासमोर सक्षम बाजू मांडल्याने निकाल फिर्यादीच्या बाजूने लागला. विशेष म्हणजे प्रकरणातील आरोपी हा व्यवसायाने शिक्षक असल्याने त्यास कायद्याचे पूर्ण ज्ञान असल्याचे न्यायालयासमोर अधोरेखित करण्यात आले. तरीदेखील त्याने कायद्याचे उल्लंघन केल्याने त्याच्यावर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी फिर्यादीच्यावतीने करण्यात आली होती. न्यायालयानेही आरोपी शिक्षक असल्यामुळे त्याच्याकडून अधिक जबाबदारी अपेक्षित असल्याचे नमूद करत जास्तीत जास्त शिक्षा आणि दंड सुनावला. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी बाबासाहेब मारुती » पान २ वर



### कायदेशीर युक्तिवाद महत्वाचा ठरला

**या प्रकरणात फिर्यादीच्या वतीने ॲड. शशिकांत सावंत यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण आणि कायदेशीर मुद्द्यांवर आधारित युक्तिवाद केला. न्यायालयानेही त्यांच्या मांडणीची गंभीर दखल घेत आरोपीचा बचाव फेटाळून लावला. बीड जिल्ह्यात विविध फौजदारी व आर्थिक प्रकरणांमध्ये अचूक कायदेशीर मांडणी आणि प्रभावी युक्तिवादामुळे ॲड.शशिकांत सावंत यांची कारकीर्द सध्या विशेष चर्चेत असून, या निकालाने त्यांच्या यशस्वी वाटचालीत आणखी एक महत्त्वपूर्ण नोंद झाली आहे. या प्रकरणात त्यांना ॲड. विशाल विलासराव कदम, ॲड.अभिषेक बहिर, ॲड. माऊली डाके, ॲड. राजकुमार धरणे, ॲड. प्रदीप दराडे, ॲड. विजय डोके, ॲड. अमोल तिडके आणि ॲड. प्रतीक गव्हाणे यांनी सहकार्य केले.**

# देशहितासाठी काटकसर हीच खरी देशभक्ती

## पंतप्रधान मोदींच्या आवाहनाला बीड जिल्ह्यातून उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा : जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख

बीड । किसान न्युज

जागतिक स्तरावर निर्माण झालेली युद्धजन्य परिस्थिती, वाढते इंधन संकट आणि बदलती आर्थिक परिस्थिती लक्षात घेता देशाचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांनी देशातील नागरिकांना काटकसर, इंधन बचत आणि राष्ट्रीय जबाबदारीचे भान राखण्याचे महत्त्वपूर्ण आवाहन केले आहे. हे आवाहन कोणत्याही प्रकारची भीती निर्माण करण्यासाठी नसून भविष्यात देशासमोर कोणतीही अडचण किंवा संकट निर्माण होऊ नये, यासाठी खबरदारीचा आणि दूरदृष्टीचा उपाय म्हणून करण्यात आले असल्याचे भारतीय जनता पार्टी बीड जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी म्हटले आहे प्रसिद्धीत दिलेल्या पत्रकात श्री देशमुख यांनी म्हटले आहे की देशहिताला सर्वोच्च प्राधान्य देत पंतप्रधानांनी स्वतःच्या ताफ्यात कपात करून आदर्श निर्माण केला असून महाराष्ट्र शासनानेही मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली मंत्र्यांचे व अधिकाऱ्यांचे परदेश दौरे रद्द करून जबाबदारीची भूमिका घेतली » पान २ वर

